मानव विकास कार्यक्रमांतर्गत १३ जिल्ह्यातील निवडक २७ तालुक्यांत कौशल्य विकास व रोजगार निर्मितीविषयक योजना राबविणे.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय, क्र. माविका- २०१७/ प्र.क्र. २९/ का. १४१८,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,
मुंबई. -४०० ०३२.
दिनांक : १९ मे, २०१८

वाचा:

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक- माविका-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८, दि. १९/०७/२०११
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक -माविका-२०१३/प्र.क्र.०४/का.१४१८, दि. २४/०७/२०१३
३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक-माविका-२०१७/प्र.क्र.२९/का.१४१८, दि.२२/०१/२०१८.
४) नियोजन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक-माविका-२०१७/प्र.क्र.२९/का.१४१८, दि.२९/०१/२०१८

प्रस्तावना:

मानव विकास कार्यक्रम ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या २३ जिल्ह्यातील १२५ तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

२. मानव विकास कार्यक्रमांअतर्गत नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक माविमि-२०१०/प्र.क्र.८१/ का.१४१८, दि.१९ जुलै, २०११ अन्वये शिक्षण, आरोग्य व बालकल्याण व उत्पन्नवाढीचे योजना राबविण्यात येत आहेत. तसेच नियोजन विभाग, शासन निर्णय क्र-माविका-२०१३/प्र.क्र.०४/का.१४१८, दि.२४ जुलै, २०१३ अन्वये रेषीम कोश विकसित करण्याकरीता कीटक संगोपनगृह बांधणे व स्वंयसहायता बचत गटाच्या माध्यमातून परसबाग / किचनगार्डन योजना राबविणे, या दोन योजना रद्द करण्यात आल्या आहेत.

३. मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांनी सन २०१७-१८च्या अर्थसंकल्पीय भाषणात खालील घोषणा केली आहे.

"मानव विकास निर्देशांकात समाविष्ट असलेल्या १२५ तालुक्यांपैकी निवडक २५ तालुक्यात रोजगारनिर्मितीसाठी एक विशेष योजना राबविण्याचा शासनाचा मानस असून त्या माध्यमातून हे तालुके रोजगारयुक्त तालुके करण्याचे शासनाने ठरविले आहे. यासाठी १०० कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. "

४. मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे सन २०१७-१८च्या अर्थसंकल्पीय भाषणात केलेल्या उपरोक्त घोषणेच्या अनुषंगाने कौशल्य विकास करुन रोजगार निर्मिती होईल, अशा विशेष योजना राबविण्यासाठी मानव विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असलेल्या २३ जिल्ह्यातील एकूण १२५ तालुक्यांपैकी १३ जिल्ह्यातील २७ तालुक्यांची निवड नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. माविका-२०१७/प्र.क्र.२९/का.१४१८, दि.२२/०१/२०१८ अन्वये करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने निवडक २७ तालुक्यांमध्ये कौशल्य विकासाच्या व रोजगार निर्मितीच्या विशेष योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

मानव विकास कार्यक्रमाखालील १३ जिल्ह्यातील निवडक २७ तालुक्यांमध्ये कौशल्य विकास व रोजगार निर्मिती होण्याचे उद्देश साध्य करण्याकरीता संयुक्त राष्ट्र यांच्या सहकार्याने "Action Room to Reduce Poverty" या नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. मानव विकास कार्यक्रमाखालील १३ जिल्ह्यातील निवडक २७ तालुक्यांमध्ये तेथील भौगोलिक, आर्थिक तसेच सामाजिक परिस्थिती विचारात घेऊन जास्तीत जास्त लोकांचा कौशल्य विकास करुन रोजगार निर्मिती होईल, अशा विशेष योजना संबंधित जिल्हाधिकारी यांनी तालुका स्तरावर अंमलात आणावयाच्या दृष्टीने दि. ३० जून, २०१८ पर्यंत तयार कराव्यात आणि याचे तपशिलवार प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर/ नाशिक/अमरावती/औरंगाबाद यांचेकडे सादर करावेत. विभागीय आयुक्त यांनी त्यांचे शिफारसीसह असा प्रस्ताव आयुक्त, मानव विकास यांचेकडे दि. १५ जुलै, २०१८ पर्यंत अंतिम मंजूरीसाठी सादर करावा. आयुक्त, मानव विकास यांनी संबंधित जिल्हाधिकारीकडून प्राप्त तपशिलवार प्रस्तावास विभागीय आयुक्त यांच्या शिफारशीप्रमाणे दि. ३१ जुलै, २०१८ पर्यंत अंतिम मंजुरी देऊन जिल्हानिहाय निधी उपलब्ध करुन द्यावा.

३. मानव विकास कार्यक्रमाखालील १३ जिल्ह्यातील २७ तालुक्यांमध्ये घ्यावयाच्या योजनांच्या प्रशासकीय मंजुरीचे अधिकार सुरुवातीस केवळ १ वर्षासाठी म्हणजे दि. ३१ मार्च २०१९ अखेरपर्यंत जिल्हाधिकारी यांना राहतील. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील उपविभाग -तीन,अ.क्र.४ नियम २७(२) (अ) मधील स्तंभ- ६ नुसार प्रति तालुका प्रत्येक योजनेसाठी रु.५० लक्ष पर्यतचे प्रशासकीय मंजूरीचे वित्तिय अधिकार संबधित जिल्हाधिकारी यांना राहतील. या वित्तिय मर्यादेत मानव विकास कार्यक्रमांतर्गत या २७ निवडक तालुक्यांमध्ये राबविण्यात येणा-या तालुका स्तरावरील योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. तथापि जिल्हाधिकारी यांनी रु.५० लक्ष पेक्षा जास्त रकमेचे प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी नियोजन विभागास सादर करावे. या निवडक २७ तालुक्यांकरीता रोजगार निर्मितीच्या योजना निवडताना आवश्यकतेनुसार प्रती एकक गुतंवणूक खर्चामध्ये तयार होणारी रोजगार क्षमता म्हणजेच "रोजगार क्षमता / भांडवली खर्च"(Employment potential/ Capital cost) ह्या सुत्रासह इतर मापदंडांचा जिल्हाधिकारी यांनी विचार करावा. तसेच अशा तालुकास्तरावरील योजनांतर्गत प्रस्तावित कामाला तांत्रिक मान्यतेप्रमाणे संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची विभागीय व जिल्हास्तरीय अधिकारी यांना प्रदान केलेले वित्तीय मर्यादा प्रमाणे राहील.

४. मानव विकास कार्यक्रमांतर्गत "Action Room to Reduce Poverty" संदर्भात १३ जिल्ह्यातील निवडक २७ तालुक्यांमध्ये कौशल्य विकास व रोजगार निर्मिती करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या तालुका स्तरावरील योजनेवर होणारा खर्च हा "मागणी क्रमांक ओ-१, २०५३, जिल्हा प्रशासन, ०९३ जिल्हा आस्थापना, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०४ आयुक्त, औरंगाबाद (०४) (०१) मानव विकास निर्देशांक वृध्दी करणे (२०५३१२३१) या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. मानव विकास कार्यक्रमाखालील १३ जिल्ह्यातील निवडक २७ तालुक्यांमध्ये कौशल्य विकास व रोजगार निर्मितीच्या योजनांच्या जिल्हास्तरावर कालबध्द अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी	-	अध्यक्ष
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद	-	सह अध्यक्ष
उपवन संरक्षक	-	सदस्य
सहायक जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रम	-	सदस्य
प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा	-	सदस्य
प्रकल्प संचालक,महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान	-	सदस्य
उपआयुक्त, जिल्हा पशुसंवर्धन	-	सदस्य
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी	-	सदस्य
जिल्हा दुग्धविकास अधिकारी	-	सदस्य
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद	-	सदस्य
सहायक आयुक्त , मत्स्यव्यवसाय विकास	-	सदस्य
जिल्हा कौशल्य विकास अधिकारी	-	सदस्य
जिल्हा समन्वयक अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ	-	सदस्य
जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास)/ जिल्हा नियोजन अधिकारी	-	सदस्य सचिव

जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीने कौशल्य विकास रोजगार निर्मितीकरीता तालुकास्तरीय योजनांकरीता मार्गदर्शक सुचना निश्चित करुन कालबध्द पध्दतीने त्याची अंमलबजावणी होण्याकरीता संनियंत्रण करावे. जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची बैठक दरमहा घेण्यात यावी व त्यासाठी “Action Room to Reduce Poverty” येथे कार्यरत UNDP या सस्थेचे “Sector Specialists” तसेच “CM Fellow” यांनाही निमंत्रित करावे.

६. वित्त विभागाचा शासन निर्णय अनौपचारिक संदर्भ क्र. ४०७/२०१७/व्यय-८, दि. २२.११.२०१७ व अनौपचारिक संदर्भ क्र. ५४८/२०१७/विनिमय, दि. २३.११.२०१७ अन्वये प्राप्त मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदरचा शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २०१८०५१९१७२७४१३११६ असा आहे. तसेच हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.05.22 11:58:59 +05'30'

(वि.फ. वसावे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव.
४. मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री (सर्व)
५. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन,मुंबई.
६. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव.
८. मा. मुख्य सचिव.
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०.सर्व विभागीय आयुक्त
११.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, चंद्रपूर व सिंधुदूर्ग
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर व सिंधुदूर्ग
१३.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, चंद्रपूर व सिंधुदूर्ग.
१४.उप आयुक्त(नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, कोंकण विभाग व नागपूर विभाग.
१५.महालेखापाल, महाराष्ट्र १ व २ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), मुंबई व नागपूर.
१६.जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग.
१७.सर्वसहसचिव / उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई. ३२.
१८.निवड नस्ती, का. १४१८.